# उत्स्फूर्तता आणि विनोदप्रियता

## आनंदमय जन्मदिवसाप्रीत्यर्थ प्रस्तुत
## श्रीगुरुमाईंसमवेत घडलेले काही प्रसंग

### श्रीगुरुमाईंसमवेतचा प्रसंग : १

*वाणी अग्रवाल*

वर्ष१९९०चे होते. महिना जानेवारी होता. मनोहारी अशा गुरुदेव सिद्धपीठामध्ये दुपार होत आली होती आणि मंद-मंद वारा वाहात होता. गुरुचौकात, जिथे श्रीगुरुमाई दर्शन देत होत्या, पूर्ण निःस्तब्धता व्याप्त होती.

मी दर्शन सहायक म्हणून सेवा करत होते. दर्शनाची वेळ संपतच आली होती आणि तेवढ्यातच एका सेवाकर्त्याने येऊन मला सांगितले की, भारतीय केंद्र सरकारचे एक वरिष्ठ मंत्री आश्रमाला भेट देण्यासाठी येत आहेत. पाच मिनिटांतच त्यांचे आगमन होईल आणि गुरुमाईंचे दर्शन घेण्याची त्यांची इच्छा आहे.

मी गुरुमाईंना याविषयी माहिती दिली. गुरुमाईंनी मान हलवून सहमती दर्शवली आणि मला त्या मंत्री महोदयांसाठी एक हार घेऊन येण्यास सांगितले. मी हार आणण्यासाठी गेले, पण मला कोणताही हार मिळाला नाही. मी गुरुचौकात परत आले आणि हार उपलब्ध नाही असे गुरुमाईंना सांगितले.

लगेचच, गुरुमाईंनी दर्शन-बास्केटमध्ये ठेवलेल्या मोगऱ्याच्या गजऱ्यांकडे माझे लक्ष वेधले. काही मिनीटांपूर्वीच एका साधकाने ते गजरे अर्पण केले होते. गुरुमाईंनी त्यातीलच काही गजऱ्यांना एकत्र बांधून त्याची एक माळ तयार करण्यास मला सांगितले.

मी गुरुमाईंच्या आसनाजवळ बसले आणि अतिशय एकाग्रतेने त्या गजऱ्यांना एकत्र बांधू लागले. गजऱ्यांना लक्षपूर्वक बांधत असताना, मी वर बघितले आणि मला दिसले की, मंत्री महोदय गुरुमाईंच्या दर्शनासाठी येऊन चुकले आहेत! त्यांनी गुडघे टेकवून मोठ्या आदराने गुरुमाईंना नमस्कार केला. आणि

नमस्कार करून ते जेव्हा उठत होते तेव्हा गुरुमाई माझ्याकडे पाहत हिंदीत म्हणाल्या, “माला.” [म्हणजे, ‘हार’] गुरुमाईंनी खूण करून सांगितले की, मीच ती माळ मंत्री महोदयांच्या गळ्यात घालावी.

माझे गजरे बांधण्याचे काम अजूनही पूर्ण झालेले नव्हते. तरीदेखील मी उठले व ती माळ त्यांच्या गळ्यात घातली. मी त्यांच्या गळ्यामध्ये माळ घालताच ती पुढच्या बाजूने सुटली. आता मंत्री महोदयांच्या गळ्याच्या दोन्ही बाजूने फुलांच्या लडी लटकत राहिल्या, ज्या मागून तर बांधलेल्या होत्या, परंतु पुढून सुटलेल्या होत्या.

गुरुमाई क्षणाचाही विलंब न करता स्मितहास्य करत मंत्री महोदयांना म्हणाल्या, “हवाईमध्ये लोकांना अशाच प्रकारे अभिवादन केले जाते.”

हे ऐकून मंत्री महोदय खूश झाले आणि म्हणाले की, अशा प्रकारे हवाईच्या पारंपारिक पद्धतीने त्यांचे स्वागत केले जाणे ही त्यांच्यासाठी गौरवास्पद गोष्ट आहे.

हा अद्भुत वार्तालाप पाहून मी विस्मयचकित झाले — गुरुमाईंनी एका अवघड प्रसंगाला अत्यंत प्रफुल्लित परिस्थितीमध्ये बदलून टाकले होते.

नंतर, मी गुरुमाईंद्वारे हवाईतील पारंपारिक माळांचा उल्लेख करण्याविषयी विचार करत राहिले, कारण ज्या हवाई माळा —ज्यांना ‘लेय्’ म्हटले जाते — मला माहित होत्या, त्या तर भारतीय माळांप्रमाणे गोल, बांधलेल्या माळा असतात. मग एके दिवशी, मला एका अत्यंत विशेष प्रकारच्या ‘लेय्’ चा फोटो दिसला, ज्याला ‘माइली लेय्’ म्हटले जाते. मला असे कळले की, त्यांचा उपयोग खास करून सन्माननीय अतिथींच्या सत्काराच्या संस्मरणीय प्रसंगी केला जातो. ही विशेष ‘लेय्’ पुढील बाजूने मोकळी असते, अगदी त्याच प्रकारे, जसे मी मोगऱ्याचे गजरे एकत्र बांधून मंत्री महोदयांना घातले होते! नंतर, हा सगळा प्रसंग आठवून मी पुन्हा आश्चर्यचकित झाले : श्रीगुरुमाईंनी अचूकतेने हे जाणले होते की, त्यांच्या दर्शनासाठी आलेल्या मंत्री महोदयांचे स्वागत कसे केले गेले पहिजे.

***

## श्रीगुरुमाईंसमवेतचा प्रसंग : २

*स्वामी अखंडानंद*

फेब्रुवारी २००४मध्ये एके दिवशी, मी आणि अन्य काही सेवाकर्ते अनुग्रह भवनाच्या खालच्या लॉबीमध्ये श्रीगुरुमाईंसमवेत काही चर्चा करत होतो. मी गुरुमाईंना ऐकण्यातील कौशल्य

सुधारण्याविषयी माझी एक कल्पना सांगितली, जिच्यामुळे, त्या जे सांगतात, ते लोक अगदी तंतोतंतपणे स्मरणात ठेऊ शकतील आणि त्याचे आकलनही त्यांना पूर्णपणे करून घेता येईल.

गुरुमाई हसल्या आणि म्हणाल्या की, त्यांनी हे पाहिले आहे की, मी जेव्हा ऐकत असतो-खास करुन त्यांना — तेव्हा मी लगेचच मान हलवून म्हणतो की, “ओह, होय!” तेव्हा असे वाटते की, मला सर्व काही अगदी त्वरेने समजते आहे, पण वस्तुतः असेही होऊ शकते की, हे काही खरे नाही! श्रीगुरुमाईंनी हे समजावून दिले की, त्या हे पाहाणे अधिक पसंत करतात की, त्यांच्या शिकवणी लोक कशा रितीने समजून घेतात; याच कारणास्तव, त्या आणखी थोड्या सावकाशपणे बोलतील आणि मग थोडा वेळ थांबतील, ज्यामुळे त्या जे काही बोलल्या आहेत, त्यावर लोक विचार करू शकतील आणि मग, त्या म्हणतील की, लोकांना जे समजले आहे ते त्यांनी तपासावे, पुन्हा तपासून खात्री करून घ्यावी.

गुरुमाईंनी तिथे उपस्थित असलेल्या एका सेवाकर्तीला याविषयी आणखी अधिक समजावून सांगण्यास सांगितले. त्या सेवाकर्तीने सांगितले की, गुरुमाई तिच्याशी माझ्या या वृत्तीविषयी बोलत होत्या आणि जे चित्र त्यांच्या मनात आले ते होते, डोक्यावरून जेट-विमानाचे उडत जाणे.

गुरुमाईंनी त्या सेवाकर्तीला, मी श्रीगुरुमाईंचे भाषण कसे ऐकतो याचा अभिनय करून दाखवण्यास सांगितले. सेवाकर्तीने नाट्यरूपाने असे चित्रित केले — तिने वर पाहिले जणू काही ती आकाशात विमान पाहते आहे आणि ती म्हणाली, “स्वामीजी म्हणतात, जूऽऽऽप — वा! काय आयडिया आहे! जूऽऽऽप — छान प्लॅन आहे! जूऽऽऽप — काय सुंदर विचार आहे! प्रत्येक जूऽऽऽप ही स्वामीजींची त्वरित दिलेली प्रतिक्रिया असते, जी ते प्रत्येक नवीन विचार वा नवीन प्लॅन ऐकताक्षणी व्यक्त करतात . . . आणि तरीदेखील. . . हे प्लॅनस् किंवा विचार आपल्या अंतरात उतरू देण्याची वाटही ते पाहत नाहीत.”

श्रीगुरुमाईंचे बोलणे ऐकण्याच्या माझ्या पद्धतीची तंतोतंत नक्कल जेव्हा या सेवाकर्तीने प्रस्तुत केली, तेव्हा सगळे हसले — मीदेखील हसलो. मला माझी सवय लक्षात आली, आणि मी कृतज्ञ झालो की, श्रीगुरुमाईंनी मला माझ्या या प्रवृत्तीप्रति जागृत केले.

यानंतर काही आठवड्यांनी, मी पुन्हा एकदा गुरुमाईंना मुक्तानंद मंदिरात भेटलो. गुरुमाई म्हणाल्या, “स्वामीजी, माझ्याकडे तुमच्यासाठी एक उपहार आहे,” त्यांच्या डोळ्यांत एक चमक होती. त्या म्हणाल्या की, हा उपहार मला स्मरण करवून देईल की, मला ऐकायचे आहे आणि विचारांना आत उतरू द्यावयाचे आहे, त्यांना समजून घ्यावयाचे आहे.

मग गुरुमाईंनी तिथे उपस्थित असलेल्या एका सेवाकर्त्याला पुढे येण्यास सांगितले. त्या सेवाकर्त्याच्या हातात चमकणारे निळ्या-पांढऱ्या रंगाचे, खेळण्यातील एक ७४७ जेट-विमान होते! आम्ही सगळे हसलो आणि मोठ्या आनंदाने मी गुरुमाईंचा हा प्रसाद स्वीकारला.

तेव्हापासून खेळण्यातील ते जेट-विमान मी माझ्या पूजेत ठेवले आहे. ज्याचा अभ्यास मला करावयाचा आहे त्याला दर्शविणारे, जेट-विमान हे एक अत्यंत प्रभावशाली प्रतिक आहे. ते मला याचे स्मरण करून देते की, श्रीगुरुमाई जेव्हा काही बोलत असतात तेव्हा मी वर्तमानात उपस्थित राहावे आणि सतर्क राहून ऐकावे, तसेच जे काही सांगितले जाते आहे त्यावर मनन करावे आणि हे शोधावे की, गुरुमाईंच्या शिकवणींमधून मला कोणती समज मिळाली आहे. प्रत्येक वेळी आपल्या श्रीगुरूंकडून प्राप्त झालेले ते विमान जेव्हा मी पाहातो तेव्हा माझ्या अंतरात कृतज्ञतेच्या भावनेचा उदय झाल्याचे मी अनुभवतो.

© २०१७ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.